जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 FEB 2022 तरूण भारत

# विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आज उद्‌घाटन

## एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ दरम्यान आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे उद्‌घाटन २२ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली,



किरण ठाकूर



प्राजक्त तनपुरे

'तरुण भारत' समूह प्रमुख, सल्लागार संपादक किरण ठाकूर उपस्थित राहणार आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशातील सर्व राज्यात विज्ञान सप्ताहाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित विज्ञान सप्ताहात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. आर के कामत, शिवाजी विद्यापीठ जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. व्ही. ए. बापट, विज्ञान विषयक लेखिका डॉ. माधुरी शानभाग, भौतिक शास्त्र विभागाचे डॉ. एम. व्ही. टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोश मंडळाच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा मार्गदर्शन करणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मातृभाषादिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आंतरराष्ट्रीय मातृभाषादिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते. यावेळी पत्रकार आणि लेखिका मीनाज लाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मराठी विभागाचे प्रा.डॉ. नंदकुमार मोरे यांचे भाषण झाले. डॉ. सुखदेव एकल यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजस चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. संगीता मोहिते यांनी आभार मानले. कार्यक्रमास विभागातील संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून विज्ञान जागृती सप्ताह

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भारत सरकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे २२ फेब्रुवारी रोजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी १०.३० वा. कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

Times of India

# Science Week begins at Shivaji university from today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University in Kolhapur will host a Science Week from Tuesday under the central government's Synergistic Training Utilising the Scientific and Technological Infrastructure (STUTI) — funded by the Department of Science and Technology (DST).

As part of this, a series of various events have been planned at the Rajarshi Shahu auditorium of Shivaji University. R G Sonkawade, coordinator of the programme, said, "The "Azadi ka Amrit Mahotsav" is an initiative of the central government to celebrate and commemorate 75 years of progressive India and the glorious history of its people, culture and achievements. The Shivaji University is the only non-agricultural university from Maharashtra among 13 centres across India, including IITs , NITs, and central universities that have been approved by the DST for programme."

For the Science Week, eminent speakers and scientists like P S Patil, Dr. V N Shinde, R.K Kamat, V A Bapat, M V Takale and Dr. Madhuri Shanbhag will deliver motivational lectures to the participating junior college students. As many as 700 students from 14 junior colleges have been identified by the committee for attending the event.